# मातृमंदिर

# कोविड केअर सेंटर

Daily

# Bulletin

19.05.21

संपर्क : -   SMS हॉस्पिटल
7798241390 / 02354260026

# Matrumandir Covid Care Center

## Daily Patient Update

**19.05.21**

| | Total Capacity | Total Occupancy | Available Beds |
|---|---|---|---|
| Total Beds | 30 | 10 | 20 |
| With O2 | 8 | 0 | 8 |
| Without O2 | 13 | 2 | 11 |
| Icu beds | 9 | 8 | 1 |
| Ventilators | 0 | 0 | 0 |



# THANK YOU

## जीएमबीएफ मातृमंदिर सोबत छात्रभारती- सेवादल संस्कार...

ग्लोबल महाराष्ट्र बिझनेस फोरम ही दुबई येथील भारतातून रोजगारा निमित्ताने आखातीदेशात स्थायिक झालेल्या उद्योजकांची संघटना जेष्ठ उद्योजक प्रसाद दातार यांच्या पुढाकाराने कार्यशील असणार्या या संघटनेत आमचा छात्रभारतीचा १९८५ ते १९९० काळचा अत्यंत ॲक्टिव सहकारी दिलावर दलवाई एक महत्वाचा सदस्य आहे.

मातृमंदिर देवरुख संस्था कोविड केअर सेंटर सुरु करीत असल्याचे त्यांने सोशल मिडीयावर वाचले आणि येथील रुग्णांच्या जेवणाची जबाबदारी अन्नपुर्णा प्रकल्पा अंतर्गत जीएमबीएफ ने घ्यावी असा प्रस्ताव मंजूर करुन घेतला. आज येथील कोविड केअर सेंटर मधील रुग्णांच्या जेवणासाठी जीएमबीएफ सहकार्य करत आहे.

GMBFचा हा उपक्रम पुण्यात डॉक्टर अभिजीत व मनीषा सोनावणे यांच्या अन्नपूर्णा संस्थे बरोबर संयुक्त विद्यमाने राबविला जात आहे.पुणे येथील समाधानकारक अनुभवावरून GMBF ने इतर विभागांची गरज पाहून रायगड, रत्नागिरी, चिपळूण , सोलापूर या भागातील स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने सहकार तत्वावर अन्नदानाचे काम सुरू केले आहे. GMBF च्या श्री दिलावर दलवाई , श्री अशोक सावन्त, श्री शिरीष अदके , श्री. राऊत , कु. जुई खेमकर यांनी येथील संयोजनाची जबाबदारी स्वीकारली आहे.

जीएमबीएफ दुबई या संस्थेने अन्नपूर्णा पुणे, Helping Hand , (चिपळूण) मातृमंदिर (देवरुख), सेवांगण (मालवण), ज्ञान प्रबोधिनी (सोलापूर चॅप्टर), सारळ ग्रामस्थ यांच्या मदतीने चालवलेल्या या सिरीयल अन्नदान उपक्रमांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

GMBF केअर्स दुबईची , वेळोवेळी संकटकाळी मदतीचा हात देणारी संस्था अशी ख्याती आहे मग ते महाराष्ट्र राज्यातील कोरोना संकट असो वाअलिबाग-कोकणातील वादळ असो , देश- परदेशात अडकून पडलेल्यांची, संकटात असणाऱ्यांना मदत करण्याची वेळ असो डाॅ सुनील मांजरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली GMBF ने नेहमीच मदतीचा हात दिला आहे.

आपल्या उद्योग धंद्यासाठी जरी आपला देश सोडला असला तरी देशवासियांबद्दल असणारी आपुलकी, प्रेम, जिव्हाळा कमी झालेला नाही. हेच GMBF केअर्सच्या सामाजिक कार्यातून स्पष्ट होत आहे.

***हॅट्स ऑफ जीएमबीएफ ग्लोबल***

यापुर्वी जून २०२० मध्ये दुबई अबुधाबी, सौदीअरेबीया या आखाती देशात करोना बंदीत अडकलेल्या आणि रोजगार गेलेल्या कोकणी लोकांना भारतात आणण्यासाठी खास चार्टर्ड विमान करून पाठविण्याची व्यवस्था करण्यात दिलावरचा पुढाकार महत्वाचा होता. दिलावर दलवाई याच्यावरील छात्रभारती सेवादलाचे संस्कार त्याला यापुढेही मातृमंदिर संस्थेच्या प्रत्येक सामाजिक उपक्रमांत सदैव साथ देतील हे निश्चित!

- अभिजित हेगशेटये

**THANK YOU**



# We Proud of You

## बरे होऊन घरी जाणारे रुग्ण हेच आमचं समाधान...

देवरुख सारख्या ग्रामीण भागातील कोविड रुग्णांना कोविड मुक्त करण्यासाठी झटणारे व मातृमंदिर कोविड केअर सेंटरची मुख्य धुरा वाहणारे डॉ.प्रकाश पाटील हे आहेत खरेखुरे कोविड योद्धा. पेशंटचा ओघ सतत सुरु असलेल्या कोविड केयर सेंटरची संपूर्ण जबाबदारी असलेले व सतत कार्यरत असलेले डॉक्टर कधीही त्रासलेले, कंटाळलेले दिसत नाहीत. अत्यंत आत्मीयतेने पेशंटच्या नातेवाईकांशी बोलताना ऐकलं कि लक्षात येत डॉक्टर परिस्थिती समजावून सांगतानाच त्याचं आवश्यक समुपदेशनही करतात.

आत्तापर्यंत ५० पेक्षा ज्यास्त रुग्ण बरे होवून घरी गेले हे सांगताना डॉक्टरांच्या चेहऱ्यावर अभिमान नाही तर समाधान दिसतं. घरातून पूर्ण सहकार्य असल्यानेच (डॉक्टरांच्या पत्नीही डॉक्टर आहेत) करोनाकाळात इतकं काम करू शकतो असही डॉक्टर नम्रपणे नमूद करतात.

मातृमंदिर कोविड केअर सेंटरमध्ये काम करताना मातृमंदिर संस्थेच्या नावाचा खूप फायदा होतो. या नावामुळे लोकं विश्वासाने इथे येतात. सोबतच गरीब रुग्णांना सवलतीमध्ये दिल जाणारे उपचार व मोफत जेवणाची व्यवस्था यामुळे दुर्गम भागातील रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे हे डॉक्टरांचं प्रामाणिक मत संस्थेच्या कामाचे महत्व अधोरेखित करतात.

**धन्यवाद डॉक्टर**




**19.05.21**

# Matrumandir Covid Care Center





# Matrumandir Covid Care Center



जमनालाल बजाज पुरस्काराने सन्मानित

## मातृमंदिर देवरुख

स्थापना १९५४

## मातृमंदिर कोविड केअर सेंटर – मदतीचे आवाहन

**देवरुख परिसरातील ५० पेक्षा अधिक गावांना कोविड आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी वैद्यकिय साधनांची गरज आहे**

- बेड/आयसीयू बेड – २०
- मॉनिटर – ६
- ऑक्सीजन कॉन्सेंट्रेटर
- औषधे
- बायपॅप मशीनस्
- रुग्ण भोजन व्यवस्था/सामग्री
- ऑक्सीमीटर

**आपण आर्थिक स्वरूपातील मदतीसह वस्तूंची मदत संस्थेला करावी. आपली मदत मोलाची ठरणार आहे. आर्थिक मदतीला ८०जी अंतर्गत आयकरात सुट मिळेल.**

## रुग्णांना मोफत जेवण आणि आरोग्य सुविधा

**आपली आर्थिक मदत आमच्यापर्यंत पोहचण्यासाठी बँक डिटेल्स्**

DONATE

## अपना सहकारी बँक लि.

**शाखा – देवरुख**

**बचत खाते क्र. – 029011100004197**

**IFSC - ASBL0000029**



संपर्क


अभिजित हेगशेटये (कार्याध्यक्ष)

आत्माराम मेस्त्री (कार्यवाह)

मातृमंदिर, देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

www.matrumandirdevrukh.org

Phone : 94220 52314 / 94224 30809